# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Ph.2539214/215/212/118 or 6659214/215/212/118

Email: preexam@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. संदीप सिताराम कडू**
एम.बी.बी.एस.,एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र), एम.बी.ए.,
पी.जी.डी.एच.एच.एम.,पी.जी.डी.एम.एल.एस., सी.एफ.एम.जे.
**परीक्षा नियंत्रक**

**Dr. Sandeep Sitaram Kadu**
M.B.B.S.,M.D.( Forensic Medicine), M.B.A.,
P.G.D.H.H.M., P.G.D.M.L.S., C.F.M.J.
**Controller of Examinations**


जा.क्र. मआविवि/एक्स-पी/६८७६ /२०२३ दि.०४/०८/२०२३

**परीपत्रक क्र. ४६ /२०२३**

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था/परीसंस्था
(पदवी अभ्यासक्रम)
म.आ.वि.वि., नाशिक

विषय : पदवी अभ्यासक्रमांच्या एम.सी.क्यू. प्रश्नांची उत्तरे लघु व दिर्घोत्तरी उत्तरपत्रिकेत लिहिण्याबाबत....

संदर्भ : दि.२०/०७/२०२३ रोजीच्या मा. परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ०५/२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास कळविण्यास येत आहे की, विद्यापीठ परीक्षेदरम्यान वैद्यकिय पदवी/ पदव्यूत्तर तसेच दंत अभ्यासक्रमाच्या, प्रायोगिक तत्वावर, ऑनलाईन प्रणालीद्वारे उत्तरपत्रिका तपासणीकरीता प्रतिदिन परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका स्कॅन करणे व संबंधित महाविद्यालयांमध्ये Digital Evaluation Cenre तयार करुन ऑनलाईन प्रणालीद्वारे उत्तरपत्रिका तपासणे (CAP) हे कार्य यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आलेले आहे.

याच धर्तीवर हिवाळी-२०२३ परीक्षेच्या वैद्यकिय, दंत, आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी, नर्सिंग (सेमिस्टर पध्दती) इ. अभ्यासक्रमांच्या प्रतिदिन परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका लगेच परीक्षाकेंद्रावर स्कॅन करणे व सर्व महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे उत्तरपत्रिका तपासण्याचे (Onscreen Evaluation of Answerbooks) काम सुरु करणे विचाराधीन आहे.

तथापि, विद्यापीठाद्वारे डीजीटल मुल्यमापनाची प्रक्रिया राबविली जात असली तरी MCQ चे OMR Scanning व लघु व दिर्घोत्तरी उत्तरपत्रिकेचे Scanning वेगवेगळे होत असल्याने कालापव्यवय होतो. त्यामुळे विद्यापीठ लेखी परीक्षेच्या परीक्षाकेंद्रावर उक्त संबंधित विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी, **Section-A च्या MCQ चे उत्तरे लिहण्यासाठी OMR Sheet न वापरता लघु व दिर्घ प्रश्नांची उत्तरे**

सोडविण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या ४४ पानी मुख्य उत्तरपत्रिकांऐवजी ४८ पानांची उत्तरपत्रिका पुरविण्याचा निर्णय परीक्षा मंडळाने दि. २०/०७/२०२३ रोजीच्या मा. परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ०५/२०२३ अन्वये घेतला आहे.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी, उपरोक्त संबंधित अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर बाब अवगत करावी व निम्न उल्लेखित उदाहरणाप्रमाणे Section-A मध्ये असणाऱ्या MCQ प्रश्नांची उत्तरे पर्यायासह, हिवाळी-२०२३ लेखी परीक्षेपासून मुख्य उत्तरपत्रिकेतील पान क्र. ३ वर लिहिण्यास सुचित करण्यात यावे. त्याचप्रमाणे उत्तरपत्रिका फक्त काळया बॉलपेनने (Only Black Ballpen) लिहिण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**For Example :**

**Question (1)** : Headquarter of Maharashtra University of Health Sciences is located at __________
A) Nashik B) Nagpur C) Mumbai D) Pune

**Answer (1)** : A) Nashik

महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या अंतर्गत मुल्यमापनाच्या परीक्षेपासून Section-A मध्ये असणाऱ्या MCQ प्रश्नांची उत्तरे पर्यायासह, महाविद्यालयाच्या उत्तरपत्रिकेतील प्रथम कोऱ्या पानावर लिहिण्याची कार्यवाही करण्यास सुरुवात करावी, जेणेकरुन विद्यार्थ्यांना या पध्दतीचा सराव होईल.

सदर परिपत्रकास आपल्या महाविद्यालयाच्या सूचनाफलकावर, संबंधितांना नोंद घेणेस्तव ठळक प्रसिध्दी द्यावी.

आपला विश्वासू,
Sd/- 4/8/23
(डॉ. संदीप सि.कडू)
परीक्षा नियंत्रक